# राष्ट्रीय मतदार दिवस




राज्य निवडणूक आयोग आणि मू .जे. महाविद्यालयाच्या सहकार्याने २५ जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिवस उत्साहात साजरा करण्यात आला .यावेळी मतदार जागृतीवर पथनाट्य, व्ही.व्ही.पॅट मशीनचे प्रात्यक्षिक तसेच तरुण मतदारांना शपथ देण्यात आली . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मू. जे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.उदय कुलकर्णी तर प्रमुख पाहुणे म्हणून अप्पर तहसीलदार अभिजित जाधव हे उपस्थित होते. या प्रसंगी नायब तहसीलदार लीला कासोदे, मू.जे. महाविद्यालयाचे मतदार जनजागृतीचे नोडल ऑफीसर प्रा.लक्ष्मण वाघ, प्रा.हर्षल पाटील, एन.एन.सी.सी.अधिकारी प्रा.भूपेंद्र केसुर, प्रा.प्रज्ञा जंगले, प्रा.सुप्रिया बोदडे उपस्थित होते .

सोमवारी २८ रोजी लोकशाही, निवडणूक आणि सुशासन याविषयी पोस्टर प्रेसेंटेशन विद्यार्थ्यानी सादर केले. यावेळी प्राचार्य डॉ. यु.डी.कुलकर्णी, प्राचार्य अविनाश काटे, संरक्षण शास्त्र विभागाचे प्रमुख डॉ.एल.पी.वाघ आदि उपस्थित होते.

सोमवारी "जागरूक मतदार लोकशाहीचा आधार" याविषयी चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. प्राचार्य डॉ. उदय कुलकर्णी उपस्थित होते. प्रा.जयेश पाडवी यांनी सोमवारी २८ रोजी "लोकशाहीपुढील आव्हाने आणि भारतीय संविधान" विषयी संवाद साधला. "लोकशाही:काल,आजउद्या" विषयी प्रा.राजीव पवार २९ रोजी व प्रा.हर्षल पाटील हे समकालीन लोकशाही व लोकशाही जगण्यातील आधारस्तंभ यावर दि. ३० रोजी मांडणी करणार आहेत, विद्यार्थ्यांना उपस्थितीचे आवाहन संरक्षण शास्त्र विभागाचे प्रमुख डॉ.एल.पी.वाघ यांनी केले आहे.